# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः30.04.2026** **वारः गुरुवार**

---

1. पश्चिम बंगालमध्ये दुसऱ्या टप्प्यात 91 पुर्णांक 66 टक्के मतदान; दोनही टप्प्यात मिळून 92 टक्क्यांपेक्षा अधिक मतदानाची नोंद
2. भारत-न्युझिलंड दरम्यानचा करार ऐतिहासिक असल्याचे न्यूझीलंडचे पंतप्रधान ख्रिस्तोफर लक्सन यांचे गौरवोद्गार
3. महाराष्ट्राचं महत्त्वाकांक्षी कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण जाहीर, दहा हजार कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक, दीड लाख जणांना रोजगाराची अपेक्षा आणि
4. मध्य प्रदेशात रस्ते अपघातात 15 मजुरांचा मृत्यू; तर कर्नाटकात भिंत कोसळून सात जण मृत्यूमुखी

**<u>मतदान</u>**

पश्चिम बंगाल विधानसभेच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात 142 मतदारसंघांमध्ये काल संध्याकाळी मतदानाची प्रक्रिया पार पडली.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आतापर्यंतच्या सर्वाधिक मतदानाची नोंद पश्चिम बंगालमध्ये झाली आहे. पश्चिम बंगाल विधानसभेच्या दोन्ही टप्प्यांमधील मतदानाची सरासरी टक्केवारी 92 पुर्णांक 47 टक्के इतकी आहे. काल झालेल्या दुसऱ्या टप्प्यासाठी 91 पुर्णांक 66 टक्के मतदानाची नोंद झाली. यापूर्वी, पश्चिम बंगालमध्ये मतदानाची सर्वाधिक नोंद 2011 च्या विधानसभा निवडणुकांमध्ये एकंदर 85 टक्के इतकी होती. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी, निवडणूक आयुक्त डॉ. एस.एस. संधू आणि डॉ. विवेक जोशी यांच्यासह, मतदानाचं बारकाईने 'लाईव्ह वेबकास्टिंग'द्वारे परिक्षण केलं.

पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू, आसाम आणि केंद्रशासित प्रदेश पुद्दुचेरी इथं पार पडलेल्या विधानसभा निवडणुकांची मतमोजणी येत्या 4 मे रोजी होणार आहे. आसाममधील सर्व 126 जागा, केरळमधील 140 जागा आणि पुद्दुचेरीमधील 30 जागांसाठीचे मतदान या महिन्याच्या 9 तारखेला पार पडलं. तामिळनाडूतील सर्व 234 विधानसभा मतदारसंघांसाठी आणि पश्चिम बंगालमधील पहिल्या टप्प्यातील 16 जिल्ह्यांमधील 152 जागांचा समावेश असलेल्या भागात मतदानाची प्रक्रिया या महिन्याच्या 23 तारखेला पार पडली.

तसंच कर्नाटकमधील बागलकोट आणि दावणगेरे दक्षिण, नागालँडमधील कोरिडांग, त्रिपुरातील धर्मनगर, महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी, तसेच गुजरातमधील उमरेठ या विधानसभा मतदारसंघांमधील पोटनिवडणुकांची मतमोजणी देखील 4 तारखेला होणार आहे.

विविध संस्थांकडून करण्यात आलेल्या मतदानोत्तर कल चाचण्यांनी वर्तवलेल्या अंदाजानुसार आसाममध्ये भाजपा पुन्हा सत्तेवर येईल तर काँग्रेसला 26 ते 36 जागा मिळतील असा अंदाज आहे.

पश्चिम बंगालमध्ये, काही एक्झिट पोल्स भाजपचा विजय होईल असा अंदाज वर्तवत आहे, तर TMC ला सुमारे 120 ते 140 जागा मिळण्याची शक्यता आहे.

केरळमध्ये, काँग्रेस पुन्हा सत्तेवर येण्याची शक्यता काही एक्झिट पोल्सनी वर्तवली आहे. तामिळनाडूमध्ये बहुतांश एक्झिट पोल्सच्या अंदाजानुसार DMK च्या नेतृत्वाखालील आघाडीला स्पष्ट आघाडी मिळेल.

**<u>उद्घाटन</u>**

उत्तर प्रदेशातल्या हरदोई जिल्ह्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत 36 कोटी 230 लाख रुपये खर्चाच्या 594 किलोमीटर लांबीच्या ग्रीनफिल्ड गंगा द्रुतगती महामार्गाचं उद्घाटन काल करण्यात आलं.

'हजारो वर्षांपासून गंगा नदी उत्तर प्रदेशची जीवनरेखा आहे, तसंच आता गंगा द्रुतगती महामार्गामुळे राज्याच्या विकासाची नवी जीवनरेखा ठरेल', असं प्रतिपादन मोदी यांनी महामार्गाच्या उद्घाटनानंतर हरदोई इथं घेतलेल्या सभेत केलं.

**न्युझिलंड**

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान झालेला मुक्त व्यापार करार ही अनेक वर्षांमधून मिळालेली ऐतिहासिक संधी असल्याचे गौरवोद्गार न्यूझीलंडचे पंतप्रधान ख्रिस्तोफर लक्सन यांनी काढले आहेत. भारतीय बाजारपेठेची व्याप्ती आणि क्षमता लक्षणीय असल्याचं त्यांनी समाज माध्यमावर प्रसारित केलेल्या ध्वनिचित्रफितीत म्हटलं आहे. वैद्यकीय क्षेत्राने भारत आणि न्यूझीलंड यांच्यात झालेल्या मुक्त व्यापार कराराचे स्वागत केलं असल्याचं' वैद्यकीय उपकरणांसाठीच्या निर्यात प्रोत्साहन परिषदे'चे कार्यकारी संचालक प्रवीण कुमार मित्तल यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं. या मुक्त व्यापार करारामुळे भारतीय वैद्यकीय उपकरणांच्या निर्यातीला चालना देण्याची संधी प्राप्त झाली आहे. असंही ते म्हणाले.

**मंत्रिमंडळ-निर्णय**

महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण 2026 जाहीर करण्यात आलं. या महत्त्वाकांक्षी धोरणाद्वारे राज्यात दहा हजार कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक करण्यात येणार असून त्यामुळे दीड लाख रोजगार संधीची निर्मिती होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. राज्यभरात कृत्रिम बुद्धिमत्ता संधीचं संतुलन साधण्यासाठी सहा एआय-उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्यात येणार असून त्याखेरीज पाच एआय इनोव्हेशन सिटीजची स्थापना केली जाणार असल्याचं या विभागाचे मंत्री आशीष शेलार यांनी सांगितलं.

सामाजिक समता आणि समरसता वर्षानिमित्त लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स या प्रख्यात संस्थेत भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन स्थापनेचा महत्त्वपूर्ण निर्णय या बैठकीत घेण्यात आला.या कायमस्वरूपी अध्यासनाच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने डॉक्टरेटसाठी शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.

**भगवानबुद्ध**

भगवान बुद्धांचे पवित्र अवशेष उद्यापासून लेहमध्ये दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहेत. हे पवित्र अवशेष भारतीय हवाई दलाच्या एका विशेष विमानानं काल लडाखमधल्या 'लेह' इथं आणण्यात आले. उद्याच्या बुद्धपौर्णिमेपासून ते 15 मेपर्यंत सामान्य नागरिकांच्या दर्शनासाठी हे अवशेष उपलब्ध असतील. लडाख पोलिसांनी या पवित्र अवशेषांना काल मानवंदना दिली, त्यानंतर त्यांच्या स्वागतानिमित्त विविध धार्मिक विधी पार पडले. भाविकांना दर्शन घेता यावं यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

दरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आजपासून दोन दिवसांच्या लडाख दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान ते भगवान बुद्धांच्या पवित्र अवशेषांचं दर्शन घेणार आहेत.

**वंदेभारत**

जम्मू तावी रेल्वे स्थानकावरून 'श्रीनगर-कटरा वंदे भारत एक्सप्रेस' सेवेला रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते आज हिरवा झेंडा दाखवण्यात येईल. सध्या श्रीनगर आणि श्री माता वैष्णो देवी कटरा दरम्यानची ही गाडी आता जम्मू तावीपर्यंत धावणार आहे.

ही गाडी आता आठ डब्यांऐवजी 20 डब्यांसह धावेल, या निर्णयामुळे पर्यटनाला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा असून ज्यामुळे पर्यटकांना श्रीनगर आणि आसपासच्या प्रेक्षणीय स्थळांना भेट देणे शक्य होईल.जम्मू आणि श्रीनगर यांच्या दरम्यानची नियमित रेल्वे सेवा शनिवारपासून सुरू होईल. ही गाडी मंगळवार वगळता आठवड्यातील सहा दिवस धावेल.

**अमेरिका-इराण**

अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यादरम्यान तणावाची परिस्थिती अद्यापही कायम आहे. इराणच्या बंदरांवर दीर्घ काळासाठी नौदल नाकेबंदी कायम ठेवण्यास तयार असल्याचे संकेत अमेरिकेने काल पुन्हा एकदा दिले. तेहरानने अण्वस्त्र

निर्मितीचा पाठपुरावा सुरू ठेवला, तर कोणताही करार होणार नाही. असा इशारा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाजा माध्यमावरील संदेशात दिला आहे. दोनही बाजूंकडून युध्दविराम आणि शांततेसाठी प्रलंबित असलेली चर्चेची फेरी आता 'दूरध्वनीवर' सुरु आहे. ताज्या घडामोडीनुसार इराणचा अणुकार्यक्रम कोणत्याही युद्धविराम कराराचा भाग असलाच पाहिजे, असा आग्रह अमेरिकेनं धरला आहे तर दुसरीकडे कोणत्याही दबावाखाली वाटाघाटी होऊ शकत नाही अशी भूमिका इराणनं घेतली आहे.

दरम्यान, इराणचा उच्च संवर्धित युरेनियमचा साठा इस्फहान इथल्या केंद्रात ठेवला असल्याचे संकेत संयुक्त राष्ट्रांच्या अणुऊर्जा देखरेख संस्थेच्या प्रमुखांनी दिले आहेत. यामुळे युरोप आणि आशियातील प्रशासन सतर्क झालं आहेत. दरम्यान, इराणचे चलन रियाल डॉलरच्या तुलनेत आतापर्यंतच्या सर्वाधिक निचांकी पातळीवर घसरला आहे.

**<u>माओवादी</u>**

झारखंडमध्ये, पश्चिम सिंहभूमनजिक सारंडा जंगलात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत, एक माओवादी ठार झाला. ठार झालेला 'इस्त्रायल पुर्ती' या माओवादयावर 1 लाख रुपयांचे बक्षीस होतं. 'कोब्रा 209 बटालियनसह सुरक्षा दलं गेल्या दोन दिवसांपासून रुतुगुटू, तुनबेदा आणि बोरोई या भागात शोधमोहीम राबवत होते. या मोहिमेदरम्यान माओवाद्यांनी केलेल्या गोळीबाराला सुरक्षा दलांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. चकमकीनंतर घटनास्थळावरून शस्त्रे आणि इतर संशयास्पद साहित्य जप्त करण्यात आले. विशिष्ट गुप्तचर माहितीच्या आधारे ही मोहीम हाती घेण्यात आल्याचे पोलीस अधीक्षक अमित रेणू यांनी सांगितलं.

**<u>अपघात</u>**

मध्य प्रदेशातील धार जिल्ह्यात काल रात्री मजुरांना घेऊन जाणारी एक पिक-अप व्हॅन उलटल्याने 15 मजुरांचा मृत्यू झाला, तर 17 जण जखमी झाले. प्राथमिक माहितीनुसार, 'बग्गड' इथूंन 35 मजूर आपल्या घरी परतत असताना हा अपघात झाला. जिल्ह्याचे प्रभारी जिल्हाधिकारी अभिषेक चौधरी यांनी याबाबतची माहिती दिली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. पंतप्रधानांनी 'पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी'तून मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी 2 लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी 50 हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनीही या घटनेबद्दल शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत. त्यांनी मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी 4 लाख रुपये, गंभीर जखमींना प्रत्येकी 1 लाख रुपये आणि इतर जखमींना प्रत्येकी 50 हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. असेही त्यांनी स्पष्ट केले.

कर्नाटकमध्ये बंगळुरू इथं वादळी पावसामुळे कुंपणाची भिंत कोसळून सात जणांचा मृत्यू झाला; मृतांमध्ये तीन लहान मुलांचा समावेश आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार